# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### शंकरपूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील वाघाई देवस्थानास पर्यटनाचा दर्जा देऊन विकास करण्याबाबत

**(१) १२२६ (०७-०४-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शंकरपूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील डोंगरगाव तलावाच्या पायथ्याशी असलेल्या वाघाई या निसर्ग पूजक पुरातन मातीची मूर्ती असलेल्या देवस्थानाचा विकास करण्याची मागणी होत असून देवस्थानाचा स्थानिक गावकऱ्यांच्या हस्ते पंच कमेटीच्या माध्यमातून खाजगीरीत्या कोणत्याही शासकीय निधीविना विकास करण्यात येत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाघाई देवस्थानास पर्यटनाचा दर्जा मिळणे तसेच त्याचा विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही, उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे. शंकरपूर येथील डोंगरगाव तलावाच्या पायथ्याशी असलेल्या वाघाई या निसर्ग पूजक पुरातन मातीची मूर्ती असलेल्या देवस्थानाचा विकास करण्याची मागणी गावक-यांकडून संबंधित ग्रामपंचायतीला झालेली नाही. तथापि, स्थानिक गावक-यांच्या हस्ते पंचकमिटीच्या माध्यमातून शासकीय निधी शिवाय खाजगीरित्या काम सुरू आहे.

(२) चकलोहारा गावाजवळ वाघाई देवस्थान आहे. संबंधित ग्रामपंचायतीने देवस्थानचा विकास करण्यासाठी मागणी केलेली दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीची प्रशासकीय नवीन इमारतीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(२) ३२४४० (०२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीची जुनी प्रशासकीय इमारत जमिनदोस्त करुन "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्त्वावर सन २०१० मध्ये सुरु केलेल्या नवीन इमारतीचे काम ११ वर्षे होवूनसुद्धा अद्यापही अर्धवट स्थितीत असल्यामुळे प्रशासकीय काम करताना कर्मचारी व नागरीकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने पनवेल पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे ६७ % जागेवर बांधकाम सुरू केले असून विकासकाला वाणिज्य संकुलासाठी देण्यात आलेली उर्वरित ३३ % जागा उपलब्ध न झाल्याने सदर जागेत कामाची सुरूवात केलेली नाही, सदरची जागा उपलब्ध करून घेण्याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, त्यानुसार इमारतीच्या बांधकामास सुरुवात करण्यात आले आहे काय, इमारतीचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(३) असल्यास, रुपये ८ कोटी खर्च करून काम सुरू झाल्यानंतर २ वर्षात उभारलेल्या अर्धवट स्थितीत असलेल्या पनवेल पंचायत समितीच्या इमारतीतील व्यावसायिक गाळे न विकल्यामुळे विकासकाने इमारतीचे काम बंद केले, त्यामुळे इमारतीचे बांधकाम अर्धवट स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय, तसेच पनवेल पंचायत समितीचे प्रलंबित असलेले काम सुरू करणेसाठी व विकासकास करण्यास येणाऱ्या अडथळयांबाबत सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल पंचायत समितीची प्रशासकीय इमारतीच्या कामात हलगर्जी करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकारी व विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विकासकाने पनवेल पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे ६७ % जागेवर बांधकाम सुरू केले असून उर्वरित ३३ % जागा विकासकाला वाणिज्य संकुलासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार वाणिज्य संकुलाचे दोन मजल्याचे स्लॅब पर्यंतचे बांधकाम पुर्ण केले आहे. दोन्ही इमारतींची बांधकामे अर्धवट स्थितीत असून सदरची कामे पुर्ण करणेबाबत विकासकास वेळोवेळी अवगत करणेत आलेले आहे.
(३) व (४) होय, हे अशत: खरे आहे.
विकासकाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (जिल्हा नांदेड) भुखंड गैरव्यवहारातील आरोपींवर कारवाई करण्याबाबत

**(३) ३३६२४ (०६-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (खै.) (जि.नांदेड) ही नगरपंचायत होण्यापूर्वी त्या ठिकाणी ग्रामपंचायत अस्तित्वात होती, सन १९९७-९८ या काळात तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत मालमत्ता बेकायदेशीर हस्तांतरीत करुन सदरील शासकीय भुखंडावर प्लॉटींग पाडुन नियमबाह्य विक्री केली असून सदरील भुखंड गैरव्यवहाराची चौकशी अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू भुखंड गैरव्यवहारातील आरोपींना शासन पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार भुखंड गैरव्यवहारातील आरोपींवर कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०३-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही .
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही .

---

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील क्रीडा संकुल व प्रशिक्षण केंद्राच्या उभारणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ३४४८७ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा वसमत यांच्या मालकीची गट क्र.१४०, १४१, १४२ मधील एकूण १० एकर जमिन तसेच २४ पैकी ०५ एकर जमिन तालुका क्रीडा संकुलनाला देण्याचे आदेश शासनाने दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीच्या मागणीसाठी तेथील लोकप्रतिनिधीनी क्रीडा व युवक कल्याण, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त उभारणीच्या निधीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदरील जागा तालुका क्रीडा संकुल समिती, वसमत जि. हिंगोली यांचे नावे दि. २२.०४.२०२२ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. क्रीडा संकुल उभारण्याकरीता सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्यामार्फत तयार करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यास निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य केंद्राना निधी उपलब्ध करणेबाबत

**(५) ३५८९८ (०६-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र इमारतींच्या बांधकामाला सन २०१८-१९ मध्ये जिल्हा नियोजन समिमीतीच्या बैठकित ४ कोटी रुपये निधी मंजूर झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची मुदत संपल्याने परत केलेला निधी मार्च अखेर खर्च करण्यास परवानगी मिळाली असून आरोग्य समितीच्या सभेत या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली तथापि जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने पुन्हा निविदा काढल्याने अडचणी निर्माण झाल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतीने माहे ऑक्टोंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, आरोग्य समितीने दिलेल्या प्रशासकीय मंजूरी व निविदा मंजूर झाल्यावर कामाची कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) काढण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,तदनुसार येथील नागरीकांना व रुग्णांना वेळेवर उपचार मिळणेसाठी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राना निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०२-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत,
१. जागतिक महामारी कोव्हिड - १९ मुळे दि. २६ मार्च, २०२० ते दि. ३१ ऑक्टोबर, २०२० अखेर लॉकडाऊन असल्याकारणाने सर्व कामकाज बंद होते.
२. तसेच सोलापूर जिल्ह्यामध्ये खाली नमुद केलेल्या कालावधीत निवडणूकीची आचारसंहिता लागू असल्याने निविदा प्रक्रीया करता आली नाही.
अ) पदवीधर/शिक्षक मतदार संघ निवडणूक (दि.१० नोव्हेबर, २०२० ते दि. ०७ डिसेंबर, २०२०),
ब) ग्रामपंचायत निवडणूक ( दि. ११ डिसेंबर, २०२० ते दि. १९, जानेवारी, २०२१,
क) पंढरपूर विधानसभा पोटनिवडणूक ( दि. १६ मार्च, २०२१ ते दि. ०७ मे, २०२१)

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेल्या यादीबाबत

**(६) ३६३२७ (०६-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सन २०१८ साली ग्रामसभेच्या ठरावाने अंतिम करून शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेल्या यादीमधील बहुतांशी लाभार्थ्यांची नावे पात्रता यादीमध्ये बसणे अपेक्षीत असताना पात्रता यादीमध्ये समाविष्ठ न झाल्याने सर्वसामान्य नागरीकांमध्ये असंतोष पसरले असल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अपात्र झालेल्या लाभार्थ्यांची जिल्हानिहाय संख्या किती आहे, याबाबत शासनाने अशा अपात्र लाभार्थ्यांना घरकूल योजनेच्या लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०२-२०२३) : (१)** हे खरे आहे.

(२) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना -
ग्रामीण अंतर्गत काही लाभार्थी अपात्र झालेले आहेत (जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे).

| | AAWAS PLUS REPORT | | | |
|---|---|---|---|---|
| **S. NO** | **DISTRICT NAME** | **TOTAL HH registered** | **Total Ineligible** | **Remaining Eligible** |
| **1.** | AHMEDNAGAR | २९३६०० | ७०१८९ | २२३४११ |
| **2.** | AKOLA | ९३१५० | २४१३९ | ६९०११ |
| **3.** | AMRAVATI | १७४१४३ | ३३९५२ | १४०१९१ |
| **4.** | AURANGABAD | २६०९४७ | ३८३९७ | २२२५५० |
| **5.** | BEED | २५८६६२ | ३३९८६ | २२४६७६ |
| **6.** | BHANDARA | १२३७३६ | ३५४०७ | ८८३२० |
| **7.** | BULDHANA | २३६५५९ | ४१३४२ | १९५२१७ |
| **8.** | CHANDRAPUR | १५७८०६ | ४०९४० | ११६८६६ |
| **9.** | DHULE | १९९५६७ | २७३०२ | १७२२६५ |
| **10.** | GADCHIROLI | १०२६२९ | २८७६२ | ७३८६७ |
| **11.** | GONDIA | १४३६१४ | ३६९७८ | १०६६३६ |
| **12.** | HINGOLI | १२४००३ | १२१३४ | १११८६९ |
| **13.** | JALGAON | ३१६७३२ | ५८४४० | २५८२९२ |
| **14.** | JALNA | २२१८५१ | ३५९२० | १८५९३१ |
| **15.** | KOLHAPUR | १८१९०३ | ८४८१४ | ९७०८९ |
| **16.** | LATUR | १५२०७९ | २९७७४ | १२२३०५ |
| **17.** | NAGPUR | ९१३२९ | ३६९५३ | ५४३७६ |
| **18.** | NANDED | ३५१३०८ | ४३३२० | ३०७९८८ |
| **19.** | NANDURBAR | १९९२३१ | १९३३१ | १७९९०० |
| **20.** | NASHIK | २८८१७१ | ५३७१५ | २३४४५६ |
| **21.** | OSMANABAD | १२४३७४ | २०५०९ | १०३८६५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22. | PALGHAR | ११२७३६ | १९३९० | ९३३४६ |
| 23. | PARBHANI | १८९५३६ | ३२२४० | १५७२९६ |
| 24. | PUNE | ११३०५४ | ३७५६९ | ७५४८५ |
| 25. | RAIGAD | ५०३९० | १५३१५ | ३५०७५ |
| 26. | RATNAGIRI | ७८७४६ | २४८१८ | ५३९२८ |
| 27. | SANGLI | १३२५८३ | ५६३८३ | ७६२०० |
| 28. | SATARA | ११८१०१ | ३०८४४ | ८७२५७ |
| 29. | SINDHUDURG | ३६७२९ | १७४२५ | १९३०४ |
| 30. | SOLAPUR | २०७४८६ | ४२६४७ | १६४८३९ |
| 31. | THANE | ५७३२९ | १५३०३ | ४२०२६ |
| 32. | WARDHA | ७५११३ | २३१६९ | ५१९४४ |
| 33. | WASHIM | १४३३८१ | २८८०४ | ११४५७७ |
| 34. | YAVATMAL | ३४९४७८ | ५९३९१ | २९००८७ |
| | TOTAL | ५७६००५६ | १२०९६०२ | ४५५०४५४ |

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत “प्रपत्र ड” मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.०९.०४.२०२१ व दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सूचना केल्या आहेत.

तथापि, सदरची लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. या संदर्भात “प्रपत्र ड” मधील म्हणजेच आवास प्लसमधील लाभार्थ्यांना लाभ देण्याविषयी आतापर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अद्याप प्राप्त नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मिळणाऱ्या घरकुलांबाबत**

**(७) ३७७३६ (१२-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात घरकुलांचा प्रधानमंत्री (ड) प्रतीक्षा यादीचा क्षेत्रीय अधिकाऱ्यामार्फत चुकीचा सर्वे करण्यात येवून प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकूल योजनेत शासनाच्या निकषात न बसणाऱ्या धनदांडग्यांची नावे घरकूल यादीत आल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरकुल यादीचा सर्व्हे करत असताना अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावागावांत भेट न देता ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयात बसून यादी बनवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त यादीमध्ये किती लाभार्थी यादीत समाविष्ट आहेत, किती घरकुले देण्यात आली आहेत तसेच किती लाभार्थी घरकुलांपासून वंचित आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती वंचित असलेल्या लाभार्थींना त्वरीत घरकुले देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) शहापुर तालुक्यात ग्रामसभेद्वारे व क्षेत्रीय तपासणीअंती पात्र ठरलेल्या एकुण ९८४४ लाभार्थ्यांच्या प्राधान्यक्रम यादीनुसार, सन २०२१-२२ करीता १२३८ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून ४७४ लाभार्थ्यांना आवास सॉफ्ट प्रणालीवर ऑनलाईन मंजुरी देण्यात आलेली आहे व उर्वरीत ७६४ लाभार्थ्यांना मंजुरीची कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत घरकुल योजना (आदिम,शबरी) अंतर्गत शहापूर तालुक्यातील सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ या कालावधीत १२५५ पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच आवास प्लस प्रपत्र ड प्राधान्यक्रम यादीमध्ये जे लाभार्थी समाविष्ट झालेले नाहीत अशा पात्र लाभार्थ्यांना राज्य पुरस्कृत घरकुल योजने अंतर्गत लाभ देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परितेवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) जिल्हा परिषद शाळेच्या ग्लोबल टिचर विरुध्द सादर केलेल्या अहवालाबाबत

**(८) ३७८९६ (१२-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परितेवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) जिल्हा परिषद शाळेचे ग्लोबल टिचर श्री.डिसले यांच्याविरुध्द दिनांक २५ मार्च २०२१ रोजी चौकशी समितीने सादर केलेला अहवाल मान्य करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्लोबल पुरस्कार मिळाल्याचे जाहीर केल्यानंतर इतर शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांना जिल्हा प्रशिक्षण संस्थेकडे प्रतिनियुक्ती देण्यात आली असून, परितेवाडी शाळेत रुजू झाल्यानंतर तीन वर्षे ते कामावर हजर झालेच नाही, असे चौकशी समितीने अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिसले गुरुजींना पुरस्कारासाठी नामांकन सादर करण्यासाठी कार्यालयाची परवानगी घेतली नाही, पुरस्काराबाबत ज्या संस्थेशी पत्र व्यवहार झाला, ईमेल, पुरस्कार मिळाल्यानंतरचे छायाचित्र, व्हिडीओ क्लिप सादर करण्यास नकार दिला, क्युआर कोड पुस्तकांचा प्रकल्प टोरॅन्टो (कॅनडा) येथे सादर करण्यास दहा दिवसांची रजा मंजूर केली होती, या व्यतिरिक्त त्यांना कोणतीही रजा मंजूर नाही, असे चौकशी समितीने अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त डिसले गुरुजीं यांच्या चौकशी अहवालाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) जिल्हा परिषद शाळेच्या ग्लोबल टिचर श्री. डिसले यांच्याविरुध्द चौकशी झाली असून सदर चौकशीच्या अनुषंगाने तपासणी खातरजमा करुन यथायोग्य पुरावे प्राप्त झाले असून सेवा नियमाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणूक ) नियम १९६७ मधील तरतुदीप्रमाणे दोषारोप पत्र प्रस्तावित करण्यात आले आहे .

(२) अंशत : खरे आहे.

(३) हे खरे आहे.

दिनांक १६.३.२०१७ ते २६.३.२०१७ या कालावधीत विशेष रजा मंजूर करण्यात आली होती. या व्यतिरिक्त कोणतीही रजा मंजूर करण्यात आलेली नाही .

(४) श्री. डिसले यांच्याविरुध्दची चौकशी ही तालुका स्तरावरुन झाली असून सदर चौकशीच्या अनुषंगाने तपासणी खातरजमा करुन यथायोग्य पुरावे प्राप्त झाले असून सेवा नियमाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणूक ) नियम १९६७ मधील तरतुदीप्रमाणे दोषारोप पत्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(९) ३८२७६ (०७-०४-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे हे बांधकाम माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पाडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांगरी-कोळवाडी (ता.जुन्नर,जि.पुणे) येथील कल्याण-आळेफाटा महामार्गावरील ग्रामपंचायत हद्दीतील कच्च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत

**(१०) ३८४७४ (०७-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांगरी-कोळवाडी (ता.जुन्नर,जि.पुणे) येथील कल्याण-आळेफाटा महामार्गावरील ग्रामपंचायत हद्दीतील सदरहू महामार्गालगत इस्सार पेट्रोलपंपाशेजारील महामार्गापासून ते विद्युत सबस्टेशन पर्यंतच्या एक किलोमिटर कच्च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत सदरहू ग्रामस्थांनी पुणे जिल्हा परिषद यांना अर्जाद्वारे अनेकवेळा मागणी करुनही अद्याप सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाच्या कामास मंजुरी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाच्या प्रस्तावास शासनास मंजुरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू भागातील ग्रामस्थ जनतेची रहदारीसाठी होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी सदरहू कच्च्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या विकासकामास त्वरीत मंजुरी देऊन रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही. जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार सदरहू कामासाठी ग्रामस्थांनी मागणी केलेली नाही.

(२) व (३) सदर रस्ता (नॉन प्लॅन) अवर्गीकृत योजनाबाह्य दर्जाचा आहे. त्यामुळे खडीकरण व डांबरीकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. मात्र सदर रस्त्याच्या दोन्हीबाजूकडील शेतकऱ्यांनी संमती दिल्यास सदर रस्ता (प्लॅन) रस्ते योजनेमध्ये समावेश करून शासन / जिल्हा परिषद स्तरावरील यासाठी असलेल्या योजनेतून या कामास मान्यता देता येणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा परिषदेकडून विकास कामाच्या भूमिपुजन व उध्दघाट्न कार्यक्रमास संबंधितांना निमंत्रित करण्यात आले नसल्याबाबत

**(११) ३८५७२ (१३-०४-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद यांचेकडून विविध विकास कामाचे भूमिपुजन व उध्दघाट्न या कार्यक्रमास स्थानिक आमदार , संबधित जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत सरपंच यांना राजशिष्टाचारानुसार निमंत्रित करणे क्रमप्राप्त असताना या कार्यक्रमास संबंधितांना निमंत्रित करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता यांनी जिल्हा परिषद बांधकाम सभापती यांच्या लेखी आदेशानुसार माजी लोकप्रतिनिधींचे नावे भूमिपूजन फलकावर टाकण्याचे आदेश असल्याने उक्त कामाचे भूमिपूजन राजशिष्टाचारानुसार झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजशिष्टाचाराचा अवमान करणाऱ्या जिल्हा परिषद बांधकाम सभापती तसेच कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता ज्यांनी लोकप्रतिनिधी यांना विश्वासात न घेता माजी लोकप्रतिनिधी यांचे नाव टाकले यांच्यावर शासन कार्यवाही करणार काय.

(४) तसेच, सदरहू कामाचे संबंधित पदाधिकाऱ्यांचे सुध्दा शिलालेखावर नामोल्लेख करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार संबंधित अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून जिल्हा परिषद, बांधकाम सभापती यांचे लेखी आदेशानुसार कोणत्याही प्रकारच्या शासकीय भूमीपूजनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला नाही. तथापि दि.२८.६.२०२१ रोजी सकाळी ८.०० वाजता जिल्हा परिषद, गर्ल्स हायस्कूल, अमरावती येथे महिला व बालविकास भवन आणि सकाळी ९.०० वाजता सायन्सकोर येथे सायंटिफिक पार्क इमारत, अमरावती या दोन्ही इमारतींच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रमांचे एकत्रित निमंत्रण पत्रिकेमध्ये करण्यात आलेला लोकप्रतिनिधी/ पदाधिकारी यांचा नामोल्लेख राजशिष्टाचारानुसार नसल्याची बाब मा. विधानसभा सदस्य, मेळघाट विधानसभा क्षेत्र यांनी पत्र दि.२८.६.२०२१ अन्वये निदर्शनास आणून दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि दि.२८.६.२०२१ रोजी रोजी सकाळी ८.०० वाजता जिल्हा परिषद, गर्ल्स हायस्कूल, अमरावती येथे महिला व बालविकास भवन आणि सकाळी ९.०० वाजता सायन्सकोर येथे सायंटिफिक पार्क इमारत, अमरावती या दोन्ही इमारतींच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रमांचे एकत्रित निमंत्रण पत्रिकेमध्ये करण्यात आलेला लोकप्रतिनिधी/पदाधिकारी यांचा नामोल्लेख राजशिष्टाचारानुसार झाला नव्हता त्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर प्रकरणी श्रीमती निला वंजारी तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, अमरावती यांनी झालेली चूक मान्य करुन माफीनामा दिलेला असल्याने तसेच भविष्यात अशी चूक पुन्हा होणार नसल्याची ग्वाही दिलेली असल्याने मा. श्री. राजकुमार पटेल, आमदार मेळघाट विधानसभा क्षेत्र यांच्या दि.२८/६/२०२१ चा हक्कभंग सूचनेच्या पत्रानुसार श्रीमती निला वंजारी कार्यकारी अभियंता यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही रद्द करणेकरिता, नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत मा. श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चु कडू, राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्रविकास, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, कामगार महाराष्ट्र राज्य यांनी दि. १६.०२.२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगाव) येथील पंचायत समितीची नविन प्रशासकीय इमारत मंजूर होणेबाबत

**(१२) ३९७०८ (११-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथील पंचायत समितीची जुनी इमारत अतिशय जीर्ण झालेली असून नविन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषद जळगाव यांनी मान्यता दिलेली आहे तसेच पंचायत समितीने ठराव सुद्धा पारित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी जागेची उपलब्धता असून नवीन प्रशासकीय इमारत मंजूर होण्यासाठी शासनाकडे रितसर प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाळीसगाव तालुका हा भौगोलिक दृष्ट्या व लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा असल्याने पंचायत समितीतील सर्व विभाग एकाच ठिकाणी असणे आवश्यक असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी ग्रामविकास मंत्री यांना माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान नवीन प्रशासकीय इमारत त्वरीत मंजूर होण्यासाठी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पंचायत समितीची नवीन प्रशासकीय इमारत त्वरीत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-१२-२०२२) :** (१) (२) (३) व (४) होय हे खरे आहे,

पंचायत समिती, चाळीसगाव (जि. जळगांव) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, जळगाव यांचे कडून दि. २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी विभागास प्राप्त झाला. त्यानुसार विभागस्तरावर छाननी करून दि.१८ फेब्रुवारी, २०२२ रोजी पंचायत समिती, चाळीसगाव (जि. जळगांव) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामास रु. ९५८.२७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील महाड येथे प्रशासकीय भवन उभारण्याच्या प्रस्तावबाबत

**(१३) ३९८७८ (०१-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड येथे प्रशासकीय भवन उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशासकीय भवनाकरिता पाटबांधरे विभागाकडून जमिन उपलब्ध होणार असून सदर जमिनीचा मोबदला शासनाकडून अदा करण्यात आला आहे काय वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तदअनुषंगाने शासनाने विचाराधीन प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०२-२०२३) :** (१) (२) (३) व (४) नाही हे खरे नाही,

जिल्हा परिषद, रायगड (जि. रायगड) जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महाड येथे प्रशासकीय भवन उभारण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजुरा गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) येथील पंचायत समितीच्या इमारतीची झालेली दुरावस्थेबाबत

**(१४) ४०५१३ (०१-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा गोंडपिपरी ( जि. चंद्रपूर) येथील पंचायत समितीच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पंचायत समितीने नविन इमारतीचे बांधकाम तातडीने करण्याकरिता तसेच निधी मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतीची पहाणी केली आहे काय, पाहणीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त पंचायत समितीच्या नविन इमारतीच्या बांधकामास मंजूरी व निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) पंचायत समिती, राजुरा (जि. चंद्रपूर) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावाची तपासणी करण्याची कार्यवाही शासनस्तरावर चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्हा परिषदेत अनुकंपाधारकांची वर्ग तीन व वर्ग चार पदाची नोकरभरती करणेबाबत.

**(१५) ४१६८३ (०१-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा परिषदेत अनुकंपाधारकांची वर्ग तीन व वर्ग चार पदाची नोकरभरती करण्यात यावी अशी मागणी राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय संघटनेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर अनुकंपाधारकांची वर्ग तीन व वर्ग चार पदाची नोकरभरती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

अनुकंपा तत्वाअंतर्गत वर्ग-३ व वर्ग-४ पदाची नोकरी भरती करणेबाबत राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय संघटनेने शासनाकडे निवेदन दिलेले नाही. तथापि, सदर संघटनेने धुळे जिल्हा परिषदेस निवेदन दिलेले आहे.

(२) अनुकंपा भरतीबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सरळसेवेच्या रिक्त पदाच्या २०% प्रमाणे धुळे जिल्हा परिषदेमध्ये दि. ०१.०१.२०२० ते दि. ३१.१२.२०२० अखेर ४१ अनुकंपा उमेदवारांना दि. २२.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामगारांना मजुरीवाढ घोषित करुन कल्याणकारी मंडळाचे काम सुरु करणेबाबत

**(१६) ४१७१६ (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगारांना सन २०१३ च्या निर्णयाप्रमाणे मजुरीवाढ घोषित करुन कल्याणकारी मंडळाचे काम सुरु करावे,असे लेखी निवेदन दिनांक १६.०१.२०२२ रोजी वा त्यासुमारास मा. कामगार मंत्री यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१५-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यंत्रमाग उद्योगातील कामगारांच्या मजुरीवाढीबाबतचा करार दि.२८.०२.२०१३ रोजी तत्कालीन मा. कामगार मंत्री यांचे उपस्थितीत झाला होता.
सदर करारातील निर्णय क्र.३ नुसार दि.०१.०५.२०२२ पासून (सन २०२२) महागाई भत्ता वाढ पिसरेटवर रुपांतरित करुन पुर्णांकामध्ये ७ पैसे वाढ (५२ पिकास मीटरवर आधारित) महागाई भत्ता मजूरी वाढ दि.१७.०१.२०२२ रोजी जाहीर करण्यात आली आहे. यंत्रमाग कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हा परिषदेत बांधकाम खात्यातील अभियंत्याने दोन वर्षे अधिक सेवा केल्याबाबत

**(१७) ४२७२६ (०७-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागांतर्गत उत्तर सोलापूर पंचायत समितीच्या कार्यालयात शाळा सोडल्याच्या दाखल्यावर चुकीची तारीख नोंदवून जिल्हा परिषदेत बांधकाम विभागातील अभियंत्याने दोन वर्षे अधिक सेवा केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी दोन वर्षांचे वेतन वसूल करण्याचे आदेश प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यावर तसेच सदर दोन वर्षांचा वेतन वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाही,
परंतु, म. ना. से. (निवृत्तीवेतन) नियम १२५ (१) मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या मनमानी कारभाराबाबत

**(१८) ४३२९८ (११-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (जि. सोलापूर) जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाची मनमानी कारभार चालू असून बढत्या, प्राथमिक शिक्षक समायोजन पदस्थापना यात मोठया प्रमाणात आर्थिक घोटाळा केल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागातील फायली (नसत्या) आर्थिक व्यवहाराशिवाय त्या पुढे सरकतच नसल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्हा परिषदेमध्ये प्रशासनाकडून होत असलेल्या मनमानी कारभाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सोलापूर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून बढत्या, प्राथमिक शिक्षक समायोजन पदस्थापना यात कोणत्याही प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार झालेले नाहीत. शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या नस्तीवर विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे शासनाच्या प्रचलित नियमानुसार व मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, तसेच मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदे मधील बांधकाम विभागाच्या टेंडर घोटाळ्याबाबत

**(१९) ४३४२५ (११-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील एका लिपिकाने कामांची एस्टिमेट कपाटात दडवून ठेवण्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लिपीकाने निविदा उघडल्यानंतर टेंडर मिळाल्याचा मेसेज व कार्यारंभ आदेश वेगळया ठेकेदारांना दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरील पुणे जिल्हा परिषदे मधील बांधकाम विभागाच्या टेंडर घोटाळ्याबाबत संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
पुणे जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागातील संबंधित लिपिकाने कामांची एस्टिमेंट कपाटात दडवून ठेवली नसून, निविदा कार्यवाही साठी प्रलंबित ठेवली होती.
(२) संबंधित लिपिकाने निविदा लिफाफा क्र. १ (तांत्रिक) व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर आपोआप सदरचा मेसेज संगणकीय प्रणाली द्वारे संबंधित ठेकेदारास जातो. त्यामुळे वेगवेगळया ठेकेदारांना मेजेस व कार्यारंभ आदेश देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच याबाबत कोणत्याही ठेकेदाराची तक्रार जिल्हा परिषदेस प्राप्त नाही.
(३) होय,
सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दि. ११.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती नेमली असून पुढील चौकशी सुरु आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि. ११.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित लिपिकास निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करुन दोषारोप ज्ञापन बजावण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलडाणा) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभार्थांना लाभ न मिळाल्याबाबत

**(२०) ४३४७९ (११-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेत मलकापूर (जि.बुलडाणा) पंचायत समिती अखत्यारीत ११ हजारांवर लाभार्थी पात्र, तर सर्वसाधारण त्रुटीमुळे २ हजार लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेत मलकापूर (जि.बुलडाणा) तालुक्यात १४ हजार १७३ घरांचा ऑनलाईन सर्व्हे करण्यात आला त्यापैकी ११ हजार १३३ लाभार्थी पात्र तर २ हजार ४८० लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले सुमारे ५६० लाभार्थ्यांना वेगवेगळया कारणावरुन सर्व्हेक्षणातून वगळण्यात आले हे देखील खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर पात्र लाभार्थी यांच्या यादीची मार्गदर्शक अटी व शर्तींनुसार पडताळणी करुन एकूण ५६७ लाभार्थ्यांना ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसभेव्दारे अपात्र ठरविण्यात आले आहे.

आवास सॉफ्ट प्रणालीवर उपलब्ध अहवालानुसार बुलडाणा जिल्हयातील मलकापूर तालुक्यातील सर्वेक्षण करण्यात आलेल्या एकुण १४,१७३ एवढया कुटूंबांपैकी एकुण ११,१२६ एवढी कुटूंबे पात्र ठरली असून, एकुण २,०८० एवढी कुटूंब अपात्र ठरली आहेत.

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.०९/०४/२०२१ व दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तद्नंतर मा.लोकप्रतिनिधी कडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने तांत्रिक कारणास्तव अपात्र ठरलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. या संदर्भात "प्रपत्र ड" मधील म्हणजेच आवास प्लसमधील लाभार्थ्यांना लाभ देण्याविषयी आतापर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अद्याप प्राप्त नाहीत..
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात राबविण्यात येत असलेल्या घरकुल योजनेचे पन्नास टक्के अर्ज नामंजूर करण्यात आल्याबाबत

**(२१) ४३७८७ (०१-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या घरकुल योजनेचे पन्नास टक्के अर्ज नामंजूर करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर नामंजूर करण्यात आलेले अर्ज मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत १४ तालुक्यातील साकव व पुलांची पुर्नबांधणी करण्याबाबत

**(२२) ४४९०३ (०७-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणारे रस्ते तसेच ग्रामीण मार्गावरील गावे वाडयांना जोडणारे १४ तालुक्यातील जवळपास १७३ पुल व साकव दुरूस्ती अभावी धोकादायक झाले असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साकव व पुलाच्या दुरूस्ती व पुर्नबांधणीसाठी जवळपास रूपये ९ कोटी निधीची आवश्यकता लागणार असून शासनाकडून पूरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने सदर सावक व पुलाच्या दुरुस्तींचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्हयातील १४ तालुक्यातील साकव व पुलांच्या पुर्नबांधणी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांवरील धोकादायक व पुर्नबांधणीच्या पुलांचे प्रस्ताव जिल्हा परिषद, रायगड यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयास सादर करण्यात आले आहे.

सदर कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डहाणू (जि. पालघर) तालुक्यातील स्थानिक ग्रामस्थांचा व विद्यार्थ्यांचा प्रवास सुखकर होणेबाबत.

**(२३) ४५३५० (०७-१०-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि. पालघर) तालुक्यातील दुर्गम भागात तसेच खाडी आणि नदी किनाऱ्यावरील गावांतील ग्रामस्थांना खाडीपलीकडे जाण्यासाठी व विद्यार्थ्यांना नदी पलीकडील असलेल्या शाळा-महाविद्यालयात शिक्षणासाठी जाण्यासाठी सोयीस्कर पुल व बंधारा नसल्याने होडीतून प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदरहू खाडीपलीकडे जाण्यासाठी सुर्या नदीवर पूल-बंधारा झाल्यास नागरिकांना तसेच वाहतुकदारांना कमी अंतराचा सोयीस्कर असा प्रवास करता येईल मात्र संबंधित विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत असल्याचे दिनांक १४.०४.२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर तालुक्यातील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना नदीवरुन प्रवास करणे सोयीचे व्हावे यासाठी सुर्या नदीवर पुल-बंधारा त्वरीत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर ठिकाणी खाडी नसून सूर्या नदी आहे. कोसेसरी व आसपासच्या गावातील ग्रामस्थांना कासा, डहाणू व पालघर शहरास जाण्यासाठी ग्रा.मा.४१४ ते रा.म.७३ हा पर्यायी मार्ग तसेच सोलशेत परिसरात जाण्यासाठी ग्रा.मा.४१४, रा.मा.७३ व रा.मा.३० हा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) विद्यार्थ्यांची निकड व सदर ठिकाणी ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांची संख्या लक्षात घेऊन सूर्या नदीवर पादचारी पूल बांधण्याकरीता ५.०० कोटी रक्कमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**खेड-दापोली-मंडणखड (जि.रत्नागिरी) येथील मंजूर क्रीडा संकुलांची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(२४) ४५५३३ (२५-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड-दापोली-मंडणखड (जि.रत्नागिरी) येथील मंजूर असलेली क्रीडा संकुलांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंजूर झालेली क्रीडा संकुलाची कामे अपूर्ण राहण्याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त क्रीडा संकुलांची कामे अपूर्ण अवस्थेत ठेवणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०१-२०२३) :**(१) व (२) तालुका क्रीडा संकुल,खेड व दापोली साठी रू.१००.०० लक्ष मर्यादेत वितरीत निधीतून काही क्रीडा सुविधा पूर्ण झाल्या असून,खेळाडू व नागरिकांमार्फत वापर सुरू आहे. उर्वरित अतिरिक्त क्रीडा सुविधांच्या अनुषंगाने सुधारीत अनुदान मर्यादेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागार्फत सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यात येत आहेत.

तालुका क्रीडा संकुल,मंडणगड साठी सन २०१६ मध्ये रू.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.संकुलासाठी योग्य जागा उपलब्ध झाली नसल्यामुळे काम सुरू होऊ शकले नाही. जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांचेकडून लघुपाटबंधारे विभागाची ०.४०.०० हे आर. जागा प्राप्त झाली असून,वाढीव अनुदान मर्यादेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अतिरिक्त क्रीडा सुविधांसह सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) तालुका क्रीडा संकुल, खेड व दापोली साठी नेमलेल्या कंत्राटदारांनी कामे अपूर्ण ठेवल्यामुळे त्यांची नेमणुक रद्द करून प्रलंबित कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतअनुकंपा भरती प्रक्रिया प्रकरणामध्ये शासन नियम व मार्गदर्शक सूचनां डावलण्यात आल्याबाबत**

**(२५) ४५६२९ (०९-१०-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडील अनुकंपा भरती प्रक्रिया प्रकरणामध्ये शासन नियम व मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याने जिल्ह्यातील इतर उमेदवारांनी आक्षेप घेत याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अनुकंपा भरतीमध्ये दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश कोकण आयुक्तांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २८ मार्च, २००१ नुसार दि. ३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या कर्मचाऱ्याचे कुटुंबिय अनुकंपा नियुक्तीस अपात्र ठरतात. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदे अंतर्गत कै. प्रकाश शिंगाडे, वरिष्ठ सहाय्यक यांना दि. ३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य असूनही त्यांची मुलगी श्रीम. विशाखा प्रकाश शिंगाडे यांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे. म्हणून श्रीम. स्नेहल रविकांत पाटील व श्री. अमोल बाळकृष्ण जंगले यांनी तक्रार केली आहे.

(२) होय हे खरे आहे.
(३) होय,

अनुकंपा नियुक्तीस पात्र नसणाऱ्या श्रीम. विशाखा शिंगाडे यांना सेवेतून कमी करणे व चुकीची नियुक्ती देणारे जबाबदार कर्मचारी श्रीम. मनिषा भास्कर देसाई-बर्डे तत्कालिन वरिष्ठ सहाय्यक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ०६ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच श्री. विनायक प्रभाकर पिंगुळकर, तत्कालिन कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ०७ अन्वये चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जानेफळ (जि.बुलढाणा) येथे बसविण्यात आलेले सौर ऊर्जेचे पथदिवे देखभाली अभावी बंद पडल्याबाबत

**(२६) ४६०३१ (०९-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जानेफळ (जि.बुलढाणा) येथे बहुतांश गावात शासनाच्या विविध योजनांद्वारे बसविण्यात आलेले सौर ऊर्जेचे पथदिवे देखभाली अभावी बंद पडल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पथदिवे पूर्ववत सुरु करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

जानेफळ (जि.बुलढाणा) येथे बहुतांश गावात सौरऊर्जेचे पथदिवे लावण्यात आलेले नसून सदरील गावात हायमास्ट लाईट बसविण्यात आलेले असून हायमास्ट लाईटची नियमीत दुरुस्ती करण्यात येत आहे.
(२) जिल्हा परिषद स्तरावर पथदिवे पुर्ववत सुरु करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील हिंगणा व काटोल येथील पेठ ते नेरी या रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) ४६१४६ (२५-०९-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा व काटोल या दोन विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातून जाणारा रस्ता पेठ ते नेरी ग्रा.मा. ३२ रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती करुन मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांना लेखी निवेदन देवूनही अद्याप रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती झाली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जवळपासच्या गावांमधील ग्रामस्थ मोठया प्रमाणात वाहतुकीकरिता सदर धोकादायक नादुरुस्त पुलाचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पेठ ते नेरी या ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्यावरील काळडोंगरी गावाजवळील रपट्याची दुरुस्ती जिल्हा परिषदेमार्फत माहे जून, २०२२ मध्ये करण्यात आली असून सदर रपटा वाहतूकीसाठी सुरक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुलुंड (पूर्व) येथील शासकीय जागेवर तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(२८) ४६१९१ (२७-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (पूर्व) येथील शासकीय जागेवर न.भू.क्र.१४४ येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलासाठी निधी प्राप्त झाला आहे काय, त्यास या क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०१-२०२३) :** (१) व (२) तालुका क्रीडा संकुल, कुर्ला विकसीत करण्यासाठी मुलुंड येथील न.भू.क्रमांक १४४ येथील जागा क्रीडा विभागास प्राप्त झालेली आहे. या क्रीडा संकुलाच्या रू. १२०.२९ लक्ष अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली असून रू. १००.०० लक्ष निधी वितरीत केला आहे. सन २०२० मध्ये सदर जागेवरील यापूर्वीचे “बागेचे” आरक्षण रद्द करून त्याऐवजी “क्रीडा संकुल” असा आरक्षणात बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प संयुक्त भागीदारी (PPP) अंतर्गत राबविण्याच्या अनुषंगाने आर्थिक व तांत्रिक सल्लागारामार्फत सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखली (जि.बुलढाणा) येथे क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉलच्या कामाच्या चौकशीबाबत

**(२९) ४६५३५ (२७-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉलचे काम करण्यात आले असून सदर हॉलचे बांधकाम बॅडमिंटन हॉलसाठी लागणा-या निकषानुसार केले नसल्याने व हॉलची उंची कमी ठेवल्याने छताचे काम सुध्दा निकृष्ट दर्जाचे झाल्याने गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त ठिकाणीच बॅडमिंटन हॉलच्या बाजूला जिमच्या हॉलचे बांधकाम करण्यात आल्याने हॉलच्या अंदाजपत्रकात टॉयलेट बाथरुमच्या कामाचा समावेश होऊन प्रत्यक्षात टॉयलेट बाथरुमचे बांधकाम न करताच देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केलेल्या मागणीनुसार जिल्हाधिकारी यांनी आदेश क्र.जा.क्र.का.वी/स्था.नी.क./कक्ष-९.३/४९९/२०२२, दिनांक १ जून, २०२२ अन्वये चौकशी समिती नेमलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे तसेच कारवाईचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) तालुका क्रीडा संकुल, चिखली करिता यापूर्वीच्या अनुदान मर्यादेत प्राप्त झालेल्या निधीतून संकुलांमध्ये विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या असून त्यांचा वापर सुरू आहे. बॅडमिंटन हॉलचे काम सन २००९ मध्ये पूर्ण झाले असून वास्तुविशारदामार्फत कामाच्या तांत्रिक बाबी तपासून संकुल समितीने कामाची देयके अदा केली आहे.

सदर बॅडमिंटन हॉल मधील त्रुटींची संकुल समितीमार्फत दुरूस्ती केली आहे. तथापि, या कामांबाबत मा. लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांची दोन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत चौकशी अहवाल अप्राप्त आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक यांच्या वेतन वाढीबाबत**

**(३०) ४६५३८ (०९-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना, महाराष्ट्र राज्य २०१० पासून वेतन वाढीच्या संदर्भात वारंवार आंदोलने करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संगणक परिचालकांना किमान वेतन कायद्यापेक्षाही कमी वेतन प्राप्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वेतन वाढीच्या संदर्भात शासन स्तरावर कोणत्या प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने परिचालकांच्या वेतन वाढीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२२) :** (१) होय.
(२) (३) व (४) आपले सरकार सेवा केंद्रामधील केंद्र चालक हे CSC कंपनीचे पगारी नोकर नसून ते स्वतंत्र उद्योजक आहेत.ग्रामपंचायतींच्या कामाचे संगणकीकरण(G२G),नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा दाखले (G२C) सेवांकरिता केंद्र चालकांना दरमहा रु.७०००/-इतके मानधन देय आहे.याव्यतिरिक्त नागरिकांना इतर व्यावसायिक सेवा पुरविल्यास केंद्रचालकांना अतिरिक्त मोबदला प्राप्त होतो.तसेच काही सेवा ग्रामस्थांना ठराविक शुल्क आकारुन उद्योजक या नात्याने त्यांना थेट पुरविता येतात.तसेच राज्य किंवा केंद्र शासनाच्या विविध योजनांचे काम करण्यासाठी केंद्र चालकांना मोबदला देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयात बालमजूरांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याबाबत.**

**(३१) ४६६८२ (०६-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील विविध विभागात बाल मजूरांच्या संख्येत वाढ झाली असून हलाखीच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी व कुटूंबाला हातभार लावण्यासाठी लहान मुले हॉटेल, किराणा, रसवंती गृहे व बांधकामावर मोठया प्रमाणावर बालमजूरी करीत असल्याचे दिनांक ०८/०६/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनामुळे दोन वर्षे शाळा बंद असल्याने ही मोलमजुरी करणारी लहान मुले शिक्षणाच्या प्रवाहातून वेगळी झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी बालमजूरी करणाऱ्या लहान मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासह त्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (११-०१-२०२३) :** (१) अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नसल्याचे कामगार आयुक्त, मुंबई यांनी कळविले आहे.

(२) व (३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडील माहितीनुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे दि.२३.६.२०२२ चे शासन निर्णयानुसार बुलडाणा जिल्ह्यामध्ये मिशन झिरो ड्रॉप आऊट राबविण्यात आली आहे.

या मोहिमेमध्ये ३-१८ वयोगटातील २१० शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आले.यापैकी ८६ विद्यार्थ्यांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले असून,१०७ मुलांना अंगणवाडी उपलब्ध नाही. तसेच उर्वरीत ७ विद्यार्थी स्थलांतरीत व दिव्यांग आहेत. तसेच ८६ नियमित शाळेत दाखल करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार,गणवेश,पाठ्यपुस्तके, शिष्यवर्ती, उपस्थिती भत्ता तसेच इतर लाभाच्या योजनेंतर्गत लाभ देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ व बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील गावांना पाणी पुरवठा योजना पूर्णपणे कार्यान्वित करण्याबाबत

**(३२) ४६९५५ (१७-०९-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ व बोदवड तालुक्यातील ८१ गाव पाणी पुरवठा योजना पुनर्जिवित करण्यात येऊनही भुसावळ तालुक्यातील काही गावांना सदर योजनेतून पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ तालुक्यातील वरणगाव, फुलगाव, कठोरा खुर्द, कठोरा बु., अंजनसोडा या पाच गावांच्या कार्यान्वित असलेल्या सामाजिक पाणी पुरवठा योजनेतून वरणगाव नगरपरिषदेसाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजुर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे या योजनेतील इतर उर्वरित चार गावांवर वीज देयक भरण्याची सक्ती करण्यात आली असून या वीज देयकाची रक्कम ही या गावांच्या लोकसंख्येच्या मानाने अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भुसावळ व बोदवड तालुक्यातील ८१ गाव पाणी पुरवठा योजना पुर्णपणे कार्यान्वित करुन भुसावळ तालुक्यातील गावांना सदर योजनेतून पाणी पुरवठा करणे तसेच वीज देयकाची रक्कम भरण्याच्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

वरणगांव नगर परिषदेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जळगांव यांचेकडून योजना प्रस्तावित आहे व त्यामुळे उर्वरित ४ गावांवर वीज देयक भरणा करण्याची जबाबदारी येते. देयकाची रक्कम येणारा खर्च गावाच्या लोकसंख्या नळ कनेक्शनच्या प्रमाणात विभागला जातो.

(४) भुसावळ व बोदवड तालुक्यातील ८१ गांवे पाणी पुरवठा योजनेची चाचणी सुरु आहे. विज देयकाची रक्कम, संबंधित ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टीची वसुली करून जिल्हा परिषद, देखभाल दुरुस्ती फंडात रक्कमेचा भरणा करण्यात येतो व त्या रकमेतून योजनेचा देखभाल दुरुस्ती, वेतन, रसायणे, वीजबिल व इतर खर्च भागविला जातो. माहे एप्रिल, २०२२ पासुन आजपर्यंत विविध प्रादेशिक योजनांवर रु. ७२.०० लक्ष वीजबिल भरण्यात आले आहे.

(५) जिल्हा परिषदेकडे देखभाल दुरुस्तीसाठीचे फंडात कमी प्रमाणात निधी उपलब्ध असल्याने विजदेयके भरण्यात विलंब होतो.

---

## खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) विभागातील पाणी टंचाईबाबत

**(३३) ४७०३२ (१७-०९-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) विभागातील जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत उत्तर शहापाडा मधील ९ वाढीव साठवण टाक्या दुरुस्ती तसेच उत्तर शहापाडा मधील २६ व दक्षिण शहापाडा मधील १२ अशा एकूण ३८ गावांकरीता जुनी व जीर्ण वितरण व्यवस्था बदलून नविन वितरण व्यवस्थेच्या अंदाज पत्रकास अद्याप मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूरीस होत असलेल्या विलंबामुळे खारेपाट विभागातील ग्रामस्थांना पाण्यासाठी अजूनही वणवण भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूरीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार नविन वितरण व्यवस्थेच्या अंदाज पत्रकास लवकरात लवकर मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

जल जीवन मिशन अंतर्गत शहापाडा व ३८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.पेण जि.रायगड योजनेस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या दि.०९.१२.२०२१ च्या आदेशान्वये तांत्रिक मान्यता व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.११.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२५८८.८० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर योजनेची निविदा प्रक्रिया अंतिम करुन कंत्राटदारास दि.०९.०६.२०२२ अन्वये कार्यरंभ आदेश देण्यात आले आहे.

प्रस्तावित योजनेमध्ये एकुण १६ उंच टाक्यांचा समावेश आहे. १६ टाक्यांपैकी ९ उंच टाक्या नव्याने प्रस्तावित आहेत. उर्वरित ७ टाक्या अस्तित्वातील जुन्या टाक्यांची दुरुस्ती, एम.एम.आर.डी.ए अंतर्गत हेटवणे धरण वाढीव उद्धव शहापाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवरील शिल्लक निधीतून करणे प्रस्तावित आहे.

(३) मंजुरीस विलंब झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मु.पो. तारळ, (ता. राजापुर, जि.रत्नागिरी) येथील उगवत लावगणवाडी येथे जाण्यासाठी रस्ता तयार करणेबाबत

**(३४) ४७१६० (०९-१०-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु. पो. तारळ (ता. राजापुर, जि.रत्नागिरी) येथील उगवत लावगणवाडी येथे जाण्यासाठी वहाळ आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पायवाटेमध्ये वहाळ येत असून पावसाळयामध्ये येथून ये-जा करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर ठिकाणी पूल बांधण्यात यावा अशी मागणी गेली अनेक वर्षांपासून ग्रामस्थ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी ग्रामस्थांचा सोयीसाठी पक्का रस्ता तयार करणे व वहाळकर पुल बांधणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्र.जि.मा.७४ ते मु.पो. तारळ येथील उगवत लावगणवाडी हा ग्रामीण मार्ग क्र.४१५ संपल्यानंतर सा.क्र.३/५०० मध्ये वहाळ आहे. सदर वहाळावर लोखंडी पादचारी फुट ब्रिज (साकव) असून सुस्थितीत आहे. सदर वहाळाच्या पलीकडचा रस्ता अवर्गीकृत स्वरुपाचा असून ग्रामीण मार्ग क्र.४५ च्या सा.क्र.२/३०० मध्ये मिळतो. सदर अवर्गीकृत रस्त्याचा रस्ते विकास आराखड्यामध्ये समावेश करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेव्दारे सुरु आहे. तसेच सदर रस्ता/वहाळावरील साकवाच्या ठिकाणी पूल बांधण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथील जिल्हा क्रीडा संकुलातील जलतरण तलावाच्या कामाची मुदत संपूनही काम पूर्ण असल्याबाबत**

**(३५) ४७३७७ (१६-०६-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली येथील ऐतिहासिक जिल्हा क्रीडा संकुलातील जलतरण तलावाच्या कामाची मुदत संपून काम पूर्ण असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जलशुद्धीकरण यंत्रणा, वीज पंप व इतर विद्युतीकरणाच्या कामासाठी दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास आलेले औरंगाबाद येथील पथकही वीज जोडणी नसल्याने परत गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी क्रीडा विभागाकडून वीज जोडणी उपलब्ध करुन न दिल्याने सन २०२२ या कालावधीच्या उन्हाळ्यात तलावाचा खेळाडूसह लाभ होणार नसल्याने खेळाडू व इतरांकडून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन जलतरण तलावाचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) जिल्हा क्रीडा संकुल, हिंगोली येथे जलतरण तलाव दुरूस्तीकरीता ई-निविदेच्या माध्यमातून जून, २०२१ मध्ये पात्र कंत्राटदारांना काम देण्यात आले आहे. तथापि, विहित कालावधीत काम पूर्ण न केल्याने जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कंत्राटदारावर विलंबाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कत्राटदाराने सादर केलेल्या खुलाश्यानुसार तपासणीच्या अनुषंगाने आवश्यक पाणी व विद्युत पुरवठा उपलब्ध करून दिलेला असून, सद्यस्थितीत जलतरण तलावाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, नगरपरिषद हिंगोलीमार्फत नियमित पाणी जोडणी मिळाल्यानंतर खेळाडू व सर्व सामान्य जनतेसाठी जलतरण तलाव वापरासाठी सुरू करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ तालुक्यात क्रीडा संकुलास मंजुरी न मिळाल्याबाबत**

**(३६) ४७६३० (२८-१०-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यामध्ये शिवछत्रपती पुरस्कार विजेते व नामांकित उत्कृष्ठ खेळाडू असून त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तसेच खेळाडूंनी सातत्याने खेळात सहभागी व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने शासनाकडून जिल्हा व तालुका स्तरावर क्रीडा संकुलाची निर्मिती केली जाते, मात्र गेली अनेक वर्षे क्रीडा

संकुलाची वारंवार मागणी होऊन अद्यापही शासनाकडून मंजुरी मिळाली नसल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यात क्रीडा संकुल नसल्याने अनेक युवकांना क्रीडा प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळत नाही, पोलीस भरती व केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या सरावासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने क्रीडा संकुल उभारण्याबाबत पाठपुरावा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-१२-२०२२) :** (१), (२) व (३) तालुक्याचे मुख्यालय वडगाव-मावळ येथे क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी सुयोग्य शासकीय जागा उपलब्ध होत नसल्याने मौजे जांभूळ येथील जागेची मागणी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे करण्यात आली आहे. जागा प्राप्त होताच तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंधराव्या वित्त आयोगातून सांगली जिल्हयाला २० कोटी रुपये मिळाले असूनही कामांची बिले प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ४७७३५ (१०-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंधराव्या वित्त आयोगातून सांगली जिल्हयाला २० कोटी रुपये मिळाले असून कामांची बिले अदा करण्यासाठी शासनाने ऑनलाईन यंत्रणा विकसित केल्या आहेत त्यांच्या वापराविषयी ग्रामपंचायतीना डिजिटल साक्षर झाल्या नसल्याने बिले प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतींना डिजिटल यंत्रणा वापरण्याचे प्रशिक्षण शासन देणार आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित बिले त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) माहे ऑगस्ट आणि सप्टेंबर, २०२२ या कालावधी मध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरावर RGSA यांचे मार्फत ग्रामसेवक, तालुका विस्तार अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद खातेप्रमुख तसेच CSC DATA ENTRY OPERATOR यांना PFMS प्रणाली बाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(३) प्रलंबित देयकांचा आढावा घेतला असता कोणतेही देयक प्रलंबित नाही असे निदर्शनास आले आहे. सध्या ग्रामपंचायत स्तरावर RGSA यांचे मार्फत देयके अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषद सफाई कामगारांचे थकीत वेतन व इमातीच्या साफसफाईसाठी निधीची तरदूत करण्याबाबत**

**(३८) ४७८१३ (१०-११-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषद इमारतीच्या साफसफाईसाठी निधीची तरदूत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद इमारत साफसफाई करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे २ महिन्याचे वेतन थकीत असल्याने सदर कामगार नोकरी सोडून निघून गेल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सफाई कामगारांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत व साफसफाईसाठी निधीची तरदूत करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
जिल्हा निधी मधील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन अदा करण्यास उचित मान्यता करुन मानधन अदा करण्यात येणार आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा, जव्हार, वाडा, विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यासह ग्रामीण भागात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(३९) ४७८३५ (१७-०९-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, वाडा, विक्रमगड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच समुद्रकिनारपट्टी भागातील एडवण, दातिवरे, कोरे यासह दहा गावांच्या क्षेत्रानजिक बांधण्यात आलेल्या विहिरीत व झऱ्यांमध्ये खारे पाणी मिसळून ते पिण्यायोग्य नसल्याने किनारपट्टीतील गावात पाणी टंचाई निर्माण होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोखाडा, जव्हार, वाडा, विक्रमगड तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच किनारपट्टी भागातील गावांमधील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर होण्याच्यादृष्टीने प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेला मंजूरी देऊन इतर उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-११-२०२२) :** (१) नाही,
सदर गावासाठी पाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत झांझरोळी धरण, केळवा असून माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये सदर धरणाचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्यामुळे काही कालावधीसाठी पाणी पुरवठा योजनेत व्यत्यय निर्माण झाला. तथापि, तातडीची बाब म्हणून धरणातून थेट पाणी उचलुन तसेच ग्रामपंचायतीमार्फत गावातील उपलब्ध स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात पाणी पुरवठा सुरु करण्यात आला.
(२) केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन या कार्यक्रमांअंतर्गत जिल्हयातील सर्वच तालुक्यातील गावाकरीता, जिल्हा परिषदेमार्फत एकूण ५६३ योजना प्रस्तावित आहेत. त्यापैकी २३४ योजनांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून इतर ३२९ योजनांना कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. याशिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदर ठिकाणी एकुण २६ योजना प्रस्तावित असून त्यापैकी ३ योजनांचे कार्यादेश देण्यात आले असून ३ योजनेस तांत्रिक मान्यता देण्याची प्रक्रीया सुरु आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सनगाव (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील जलजिवन मशीन कार्याक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या नियमबाह्यरित्या ई-निविदा मागविण्यात आल्याबाबत**

**(४०) ४८०८० (११-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सनगाव, ता. अंबाजोगाई, जि. बीड. येथील जलजिवन मशीन कार्याक्रमांतर्गत रु. ७४,६३,३००/- इतक्या रक्कमेच्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या ई - निवीदा दि . ०८/०२/२०२२ ते १५/०२/२०२२ या कालावधीत मागविण्यात आलेल्या होत्या, हे खरे आहे काय

(२) असल्यास, तांत्रीक अडचणीमुळे सदरील निविदा मागविण्याची अंतिम तारीख दि २२/०२/२०२२ पर्यंत वाढविण्यात येऊन त्यानुसार श्री, अमोल बापुराव जाधव, श्री, दिग्वीजय व्दारकादास डावकर व एच के कंन्ट्रक्शन यांनी दि २२/०२/२०२२ रोजी ई-निदा भरल्या होत्या हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरील ई-निविदा दि. २४/०२/२०२२ रोजी उघडणे आवश्यक असतांना त्या न उघडता एच. के कंन्ट्रक्शन यांची निविदा दिनांक ५/०३/२०२२ तसेच सर्वश्री अमोल बापुराव जाधव व दिग्वीजय व्दारकादास डावकर यांनी भरलेली निविदा दिनांक १०/०३/२०२२ रोजी उघडण्यात येऊन श्री.अमोल बापुरावर जाधव यांची निविदा मंजूर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १०/३/२०२२ रोजी उघडण्यात आलेल्या निविदेच्या कार्यारंभ आदेशावर दि. ४/३/२०२२ व ८/३/२०२२ ची नोंद असल्याचे निदर्शनास येते तसेच श्री डावकर हे टि.एस.पी असून त्यांची निविदा रद्द केलेली असतांना देखील त्यांची निविदा गैरप्रकारे स्विकारुन त्यांचे नावे कार्यारंभ आदेश देण्यात आले हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नळ पाणी पुरवठा योजनेच्या ई-निविदा प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांच्याकडे दि.१७/०६/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-१२-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सदर ई-निविदेतील अनियमिततेबाबत मे. एच. के. कंन्स्ट्रक्शन व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका क्र. ३४६६/२०२२ अन्वये याचिका सादर केली होती. याबाबतीत मा. उच्च न्यायालयाची सदरील योजनेच्या ई-निविदा प्रक्रियेत अनियमीतता झाले नसल्याबाबत खात्री झाल्याने संबंधिताची याचिका मा. उच्च न्यायालयाने खारीज केली असल्याने पुन्हा चौकशीची आवश्यकता वाटली नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा येथील शासकीय कामगार अधिकारी कार्यालयात लाभार्थींची बनावट यादी सादर करण्यात आल्याबाबत**

**(४१) ४८११० (०७-११-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील शासकीय कामगार अधिकारी कार्यालयात लाभ मिळविण्यासाठी शासकीय कंत्राटदाराच्या बनावट

स्वाक्षरी आणि शिक्कयाने ६३४ कामगारांच्या नावांची यादी सादर करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बनावट लाभार्थी कामगारांच्या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१५-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

कंत्राटदाराकडून ६३४ कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र जारी केल्याचे सरकारी कामगार अधिकारी, वर्धा कार्यालयाच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधित कंत्राटदारास विचारणा केली. सदर कंत्राटदाराने ६३४ कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र जारी न केल्याबाबत कळविले आहे.
(२) सरकारी कामगार अधिकारी तथा उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, वर्धा कार्यालयाकडून ४८ कामगारांची प्रत्यक्ष मौका चौकशी करुन पडताळणी करण्यात आली असून उर्वरित बांधकाम कामगारांची चौकशी सुरु आहे. त्यादरम्यान मंडळामार्फत ६३४ कामगारांचे नोंदणी /नुतनीकरण अर्ज तात्काळ प्रतिबंधित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ललित कला भवन पुर्नबांधणी प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत**

**(४२) ४८१३० (०९-११-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभ्युदयनगर, मुंबई येथील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ललित कला भवन धोकादायक झाल्याने तोडण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ललित कला भवन पुर्नबांधणी संदर्भात कामगार कल्याण मंडळाने प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ललीत कला भवन, अभ्युदयनगर येथील परिसराचा पुनर्विकास समुह विकास (क्लस्टर डेव्हलपमेंट) योजनेअंतर्गत म्हाडा मार्फत करण्यात येणार आहे. सदर प्रक्रियेस किती कालावधी लागेल याबाबत अनिश्चिता असल्यामुळे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने सदर भूखंडाचा विकास विशेष बाब म्हणून करुन देण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडास सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील विविध विभागाचे शासकीय कार्यालयातील**
**अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याबाबत**

**(४३) ४८१८७ (०९-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरातील विविध विभागातील प्रमुख शासकीय कार्यालयात अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहत

नसल्यामुळे नागरिकांची विविध विकास कामे प्रलंबित राहत असून,सामान्य जनतेला संबंधित कार्यालयात वारंवार जावे लागत असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जालना जिल्हयाचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अचानक भेटी दौऱ्यात सर्व प्रमुख शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी गैरहजर किंव्हा विविध कारणे सांगून उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणातील गैरहजर कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हा परिषद, जालना यांचे तर्फे प्रस्तावित करण्यात आली आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जनतेला होणारा त्रास लक्षात घेता गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द प्रस्तावित शिस्तभंगाची कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद, जालना अंतर्गत सदर बाब निदर्शनास आली आहे.
(२) माहे मार्च, २०२२ मध्ये जिल्हा परिषद, जालना अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती तपासण्यात आली होती. तपासणी मध्ये अनेक अधिकारी/कर्मचारी विनापरवानगी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) माहे मार्च, २०२२ मध्ये जिल्हा परिषद, जालना अंतर्गत विविध कार्यालयांची उपस्थिती तपासण्यात आली. त्यामध्ये विनापरवानगी अनुपस्थित असलेल्या ३० कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला. त्यापैकी ०८ कर्मचाऱ्यांचा खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात आला, उर्वरित २२ कर्मचाऱ्यांचा खुलासा समाधानकारक नसल्याने दि. २०.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित अनुपस्थित कर्मचाऱ्यांचे एक दिवसाची विनावेतन रजा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील जल-जीवन मिशनच्या प्रलंबित कामांमुळे निर्माण झालेली पाणी टंचाई

**(४४) ४८२६२ (२३-०९-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात लहान मोठी अशी एकूण ३१४ धरण असून त्यामध्ये पुरेसा पाणीपुरवठा असला तरी, शासनाच्या जल-जीवन मिशन पाणी पुरवठा २०२१-२२ च्या आराखड्यानुसार ५८५ योजनांपैकी ५२५ योजनांना मंजूरी मिळणे व या मंजूर योजनांपैकी केवळ ५० योजनाच पुर्ण होऊन कार्यान्वित झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर ४२५ योजनांच्या प्रलंबित कामांमुळे विदर्भात पाणी टंचाई निर्माण होऊन येथील नागरीकांना वर्षभरापासून ४ दिवसाआड पाणी मिळत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विदर्भातील पाणी टंचाई दुरु करण्याकरिता सदर प्रलंबित योजना तातडीने पुर्ण करुन कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-११-२०२२) :** (१) व (२) जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२१-२२ च्या वार्षिक कृती आराखडयामध्ये विदर्भातील ११ जिल्ह्याकरिता १०४४९ पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात आला होता. सन २०२१-२२ च्या कृती आराखड्यातील पुर्ण न झालेल्या योजना सन २०२२-२३ च्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये घेण्यात आल्या आहेत. राज्याच्या एकत्रित कृती आराखड्याच्या दि.१८.१०.२०२२ रोजीच्या सद्यस्थितीनुसार १०७९२ योजनांपैकी १०३७७ योजनांचे अंदाजपत्रके तयार झाली असून त्यापैकी ९९६४ योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ९८१४ कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ७१२९ योजनांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून प्रत्यक्षात १०२९ योजनांची कामे पुर्ण झालेली आहेत.

तसेच विदर्भातील पाणी टंचाई निवारणार्थ सन २०२१-२२ करिता पाणी टंचाई उदभवणाऱ्या गावाकरिता आवश्यकतेनुसार जसे की नळ योजना विशेष दुरुस्ती, तात्पुरती पूरक नळ योजना, खाजगी विहिर अधिग्रहण , विंधन विहीर/कुपनलिका घेणे इ. कामे घेण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## पालघर जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ४८३५९ (१०-११-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत दोन टप्पे पूर्ण होऊन पालघर या आदिवासी जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास राज्य शासनाने मंजूरी देऊन तो १ वर्षापूर्वी केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात पालघर जिल्हयातील आठ तालुक्यांमधील १३८ किमी लांबीचे इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाचा दर्जा सुधार प्रस्तावाला १९ रस्त्यांच्या समावेश असून त्यासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचे तथापि सदर प्रस्तावात केंद्र शासनाने अद्याप मंजूरी दिली नसल्याचेही दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजूरी मिळण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना २०२२-२३ बॅच-१ मधील प्रस्ताव मंजूरीबाबत केंद्र शासनाकडील Empowered Committee ची बैठक दि.१६.११.२०२२ रोजी झाली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांची पुर्तता राज्य शासनाकडून दि.१३.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. त्यानुसार केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि.१२ जानेवारी,२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्यासाठी एकूण २५५१.६३३ कि.मी. इतक्या लांबीच्या ४१२ रस्त्यांच्या कामांना मंजूरी दिली असून, त्यामध्ये पालघर जिल्हयासाठी एकूण १२१.३९० कि.मी.लांबीची १८ कामे मंजूर केली आहेत. सदर मंजूरी दिलेल्या कामांबाबत प्रशासकीय मान्यता व पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खरोसा व पानचिंचोली (जि.लातूर) पाणीपुरवठा योजना निम्न तेरणा प्रकल्पातून कार्यान्वित करण्याबाबत

**(४६) ४८४२८ (२०-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील खरोसा ९ गावे व पानचिंचोली ११ गावांसाठी मसलगा धारणातून प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित असून मसलगा धरणात उन्हाळ्यात पाणीसाठा शिल्लक राहत नसल्याने सदरील दोन्ही योजना निम्न तेरणा प्रकल्प माकणी (ता.लोहारा) या प्रकल्पातून कार्यान्वित करण्याबाबत औसा येथील लोकप्रतिनिधींनी मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री आणि मा. पालकमंत्री, लातूर यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२६-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पानचिंचोली प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील ११ गावांपैकी १० गावांनी स्वतंत्र योजनेची मागणी केल्याने यातील १० गावांना जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या निकषानुसार पाणी पुरवठा करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृती आराखड्यात स्वतंत्र योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्याद्वारे गावास सद्य:स्थितीत उपलब्ध जलनिष्पत्तीनुसार पाणी पुरवठा सुरू आहे. व यातील पानचिंचोली या एका गावाकरीता जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या निकषानुसार रेट्रोफिटींग प्रस्तावित करण्यात आले आहे.

पानचिंचोली व खरोसा ९ गावांची मसलगा धरणात वार्षिक ०.६७ द.ल.घ.मी. इतकी पाणी मागणी येते. ही मागणी मागील चार वर्षाच्या धरणातील उपलब्ध पाणीसाठ्यानुसार सर्वसाधारणपणे भागविली जाऊ शकते. सदर दोन्ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना निम्न तेरणा प्रकल्प उद्भव धरुन प्रस्तावित करावयाच्या झाल्यास अंदाजे रु. ९४.०० कोटी खर्च अपेक्षित असून, योजनेचा दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा वार्षिक खर्च जास्तीचा होणार असल्याने सदर दोन्ही योजनांसाठी निम्न तेरणा प्रकल्प उद्भव धरुन योजना केल्यास ही योजना खर्चीक असुन परवडणारी होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी प्रलंबित असल्याबाबत

**(४७) ४८४३० (०९-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदारसंघातील सन २०२०, २०२१ व २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत औसा व निलंगा तालुक्यातील (जि.लातूर) अनेक रस्ते व पूल वाहून गेले असून पुरहानी अंतर्गत गट ब आणि क अंतर्गत सदरील रस्त्यांची दुरूस्ती व पुल बांधकाम करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये निवेदनद्वारे तसेच जिल्हा नियोजन समिती लातूर च्या २०२१ ते आजतागायत झालेल्या प्रत्येक बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या ग्रामीण मार्गासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आला असून सदरील पूल तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, सदरील निधी मागणीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद लातूर यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत आणि रस्त्यांची व फुलांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या रस्ते व पूलांच्या दुरुस्तीकरीता सन २०२०-२१ साठी रु.२६७५ लक्ष व सन २०२१-२२ साठी रु.१३०४० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) हे खरे आहे.
(४) अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या व त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी दि.२८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३०५४-२९११ हे स्वतंत्र नवीन लेखाशिर्ष घेण्यात आले आहे. सदर लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून अतिवृष्टीमुळे बाधित रस्त्यांची कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कनेरसर (जि.पुणे) गावात पाणी टंचाई निमार्ण झाल्याबाबत

**(४८) ४८५८१ (२०-०९-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेरसर (जि.पुणे) गावात पाणी टंचाई निर्माण झाल्याने येथील गावक-यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कळमोडी उपसा योजनेची अंतिम मान्यता नाकारल्याने सदर गावात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेला मान्यता नाकारण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त योजना या गावाकरीता सुरू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-११-२०२२) :** (१) कनेरसर गावासाठी उन्हाळाच्या कालावधीमध्ये अस्तिवातातील पिण्याच्या पाण्याची भूजल पातळी खालवाली असता, सदर गावास उक्त कालावधीत टॅंकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) व (३) कळमोडी मध्यम प्रकल्प योजनेबाबत जलसंपदा विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, कनेरसर हे गाव कळमोडी उपसा सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रात येत नाही.

कनेरसर गावास कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्याकरिता जल जीवन मिशन अंतर्गत प्रादेशिक योजनेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## धुळे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला पूर्णवेळ कार्यकारी अभियंता हे पद रिक्त असल्याबाबत

**(४९) ४९७७६ (२१-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील पूर्णवेळ कार्यकारी अभियंता हे पद रिक्त असल्याने पाणीपुरवठा संबंधीत अनेक कामे प्रलंबित असल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक ७.६.२०२२ च्या आदेशान्वये, श्रीमती जयश्री देवकिशन सार्वे यांना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धुळे येथे पदोन्नतीने पदस्थापना दिली आहे. तथापि श्रीमती सार्वे दिनांक ४.६.२०२२ ते ३०.११.२०२२ पर्यंत प्रसुती रजेवर होत्या. सदर रजा कालावधीत त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी दिनांक १४.७.२०२२ च्या आदेशान्वये श्री.मुकेश ठाकुर, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडे सोपविला असून, त्यांनी अतिरिक्त कामकाज सांभाळून प्रभावीपणे पाणी पुरवठा संबंधित अनेक कामे मार्गी लावली आहेत. सद्यस्थितीत प्रसुती रजा उपभोगून श्रीमती सार्वे दिनांक २.१२.२०२२ पासून ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धुळे येथे नियमित रुजू झाल्या आहेत, त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धुळे येथील कार्यकारी अभियंता हे पद भरलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात पूर्णवेळ सरकारी कामगार अधिकारी देण्यात यावा तसेच संघटित आणि असंघटीत कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(५०) ४९८९९ (१८-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदर्ग जिल्ह्यातील संघटित आणि असंघटीत कामगारांनी महाराष्ट्र वेतन कोड २०१९ तसेच सामाजिक सुरक्षा कोड २०१९ लागू करण्यात यावा, घरेलू कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज सुरु करण्यात यावे, कामगार राज्य विमा योजना सुविधेची अंमलबजावणी करण्यात यावी, कंत्राटी कामगारांना न्याय मिळावा, सिंधुदूर्ग जिल्ह्यात पूर्णवेळ सरकारी कामगार अधिकारी देण्यात यावा इत्यादी विविध मागण्यांसाठी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तसेच कामगारांच्या मागण्यांच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२८-०२-२०२३) :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संघटित-असंघटित कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या भारतीय मजदूर संघ, सिंधुदुर्ग यांनी दि.१७.०८.२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे कामगारांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने आंदोलन केले.

(२) व (३) सरकारी कामगार अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयात किमान वेतन कायद्याच्या अंमलबजावणीबाबत तसेच, समेट कारवाईतील एकही प्रकरण प्रलंबित नाही. सदर निवेदनामध्ये महाराष्ट्र वेतन कोड, २०१९ तसेच, सामाजिक सुरक्षा कोड, २०१९ लागू करण्यात यावा या मागणीचा समावेश नाही.

महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ दि.१२.०८.२०११ रोजी स्थापन करण्यात आले असून मंडळाचे कामकाज सुरु आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८ (ESIC) ची अंशत: अंमलबजावणी करण्यात येत आहे. ESIC मुख्य कार्यालय, नवी दिल्ली यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ०१ दवाखान्यासह शाखा कार्यालय (DCBO) मंजूर केले असून ते कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, दुय्यम काळजीसाठी टाय-अप रुग्णालयांची संख्या-०१ असून प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत उपलब्ध रुग्णालयांची संख्या-१४ आहे.

तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरकारी कामगार अधिकारी पदावरील उमेदवार नजीकच्या काळात उपलब्ध होणार आहेत. तद्नंतर सिंधुदुर्ग येथे पूर्णवेळ सरकारी कामगार अधिकारी देणे शक्य होईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.